FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154219

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ९२, वर्ष Year २०२२ दिनांक Date 03/03/२०२२
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......
3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार तारीख पासून २८/०२/२०२२ रोजी १४.०० वा. तारीख पर्यंत 03/03/२०२२ वेळ रोजी १२.५५ वा.
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 03/03/2022 वेळ Time २३.१० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेवा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४८/२०२२ तारीख Date 03/03/२०२२ वेळ Time २३.५० वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information ......, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ......, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहकार व वस्त्रोद्योग विभाग, उपनिबंधक सहकारी संस्था,
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place 'आर' उत्तर विभाग, पोस्ट Post कांदिवली तालुका Taluka पुर्व. जिल्हा Dist. मुंबई १०१ राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ......, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist., State
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. सुशीलकुमार जोशी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. कैलाशचंद्र जोशी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ६९ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८२०२६४१००
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. -, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address E/७०३, गल्ली / सर्वे नं. Ward, घर House/Name No. अभिषेक बिल्डींग, जयराज नगर, बोरिवली पश्चिम
   रस्त्याचे नाव Road मुंबई ९२, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P Stn. ......
   तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......, सध्याचा पत्ता Present Address ......
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

श्री. देविदास ज्ञानदेव कुवडे, ५६ वर्षे, सहकार अधिकारी श्रेणी २, उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, 'आर' उत्तर, कांदिवली पु. मुंबई १०१, रा. ठि. A/६, नवरत्न को.हा.सोसा. फ्लॅट नं. ६०, गोराई I, स्वामी विवेकानंद शाळेजवळ, बोरिवली प. मुंबई ९२ मो.नं. ९८९२२५६५०९

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

यातील तक्रारदार श्री. सुशिलकुमार कैलाशचंद्र जोशी, वय ६७ वर्षे, यांचा दि. ०३/०३/२०२२ रोजी स्वतंत्र पानावर संगणकावर मराठीतुन टंकलिखीत केलेला जबाब हाच नमुद गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(अमोल काबमारे)
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई

(SUSHIL KUMAR JOSHI)

जबाब

दि. ०३/०३/२०२२

श्री.सुशीलकुमार कैलाशचंद्र जोशी, वय ६१ वर्षे, धंदा- नोकरी (सी.ए.), रा.ठि. ई/७०१, ॲमेझॉन बिल्डिंग, जयराज नगर, बोरीवली पश्चिम, मुंबई ४०००९१, मो.क्र. ९८२०२६४१००

मी वरीलप्रमाणे असून उपरोक्त नमुद पत्त्यावर रहावयास आहे. मी व माझी पत्नी असे दोघेही चार्टड अकाऊंट असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी राहत असलेल्या ई/७०१, ॲमेझॉन बिल्डिंग, जयराज नगर, बोरीवली पश्चिम, मुंबई येथील सदनिका ही माझी पत्नी श्रीमती मंजू सुशीलकुमार जोशी हिचे नावे आहे. सोसायटीचे पदाधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत माझी पत्नी श्रीमत मंजू जोशी हिने मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथे कलम ७५ (५) महाराष्ट को ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० प्रमाणे तक्रार अर्ज केला होता. सदर तक्रार अर्जासंदर्भात मी उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील डेप्युटी रजीस्ट्रार श्री. कटरे यांना ४ ते ५ वेळा भेटलो. त्यानंतर १५ दिवसांपुर्वी मी पुन्हा डेप्युटी रजीस्ट्रार श्री. कटरे यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो असता सदर ठिकाणी मला श्रीकांत नावाची खाजगी व्यक्ती भेटली. श्रीकांत यांनी मला कटरे साहेबांनी माझे कामासंबंधात श्री कवडे, यांना भेटण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सोसायटीचे पदाधिकारी यांच्या विरोधात केलेल्या कलम ७५ (५) महाराष्ट को ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० प्रमाणे केलेल्या तक्रार अर्जा संदर्भात श्री कवडे, यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी माझे अर्जा संदर्भात पुढील कार्यवाही करण्याकरीता माझेकडे रू. ५०,०००/- इतक्या रक्कमेची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सध्या माझेकडे पैसे नसल्याचे सांगुन नंतर भेटतो असे सांगुन त्यांच्या कार्यालयातुन निघुन आलो.

मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. कवडे यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक २८/०२/२०२२ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे स.पो.आ. हर्षल चव्हाण व पो.नि. वाघमारे यांना भेटलो असता त्यांनी श्री. कवडे यांनी लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. मी माझा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात इंग्रजी भाषेमध्ये लिहून दिला. पो.नि. वाघमारे यांनी सदर अर्जावर माझी सही घेतली. दि. २८/०२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळ संपत आल्याने लोकसेवक श्री. कवडे यांची भेट होण्याची शक्यता नसल्याने तसेच दि. ०१/०३/२०२२ रोजी शासकिय सुट्टी असल्याने पो. नि. वाघमारे यांनी माझे अर्जावर दिनांक ०२/०३/२०२२ रोजी कारवाई करण्यात येईल असे सांगुन मला दिनांक ०२/०३/२०२२ रोजी लाप्रवि कार्यालयात सकाळी ११.०० वाजता येण्यास सांगितले.

पो.नि. वाघमारे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दि. ०२/०३/२०२२ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालायातील चौथ्या मजल्यावरील कक्ष क्र. ४०६ मध्ये सकाळी ११.०० वाजता हजर झालो. सदर ठिकाणी पो.नि. वाघमारे यांचेसोबत उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक २८/०२/२०२२ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. वाघमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. वाघमारे यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि वाघमारे यांनी दिनांक ०२/०३/२०२२ रोजी पंचांसमक्ष मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. कवडे यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

(SUSHIL KUMAR JOSHI)

सहकार
म नं.
नं.

पो.नि वाघमारे यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून कांदिवली पुर्व येथील ठाकुर कॉम्पलेक्स गेटच्या आतील बाजुस असलेल्या शिवम सुंदरम हॉटिलच्या परिसरात शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि. वाघमारे यांनी मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. कवडे यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. गवळी यांचे सह रिक्षाने पाठविले. लोकसेवक कवडे हे कार्यालयात उपस्थित होते. माझे व लोकसेवकामध्ये माझे कामसंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक कवडे यांनी माझे सोसायटीचे पदाधिकारी यांच्या विरोधात केलेल्या प्रलंबित तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता माझेकडे रू. ५०,०००/- रक्कम दर्शविणारा अंक ५० असे कागदावर लिहून लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रू ४०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. लोकसेवक कवडे यांनी लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता रू.२०,०००/- घेवुन दि. ०३/०३/२०२२ रोजी सकाळी पुन्हा कार्यालयात येण्यास सांगितले.

त्यानंतर मी कांदिवली पुर्व येथील ठाकुर कॉम्पलेक्स गेटच्या आतील बाजुस असलेल्या शिवम सुंदरम हॉटिलच्या परिसरात उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. वाघमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचांना व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. कवडे याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक याने लाचेची रक्कमेचा पहिला हप्ता रू.२०,०००/- दि. ०३/०३/२०२२ रोजी घेवुन येण्यास सांगितल्याने पो.नि. वाघमारे यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी मला घरी जाण्यास सांगितले व लाचेच्या मागणीप्रमाणे मला रू. २०,०००/- ची व्यवस्था करून दि. ०३/०३/२०२२ रोजी परस्पर ठाकुर कॉम्पलेक्स गेटच्या आतील बाजुस असलेल्या शिवम सुंदरम हॉटिल जवळ सकाळी १०.३० वाजता येण्यास सांगितले.

मी दिनांक ०३/०३/२०२२ रोजी ठाकुर कॉम्पलेक्स गेटच्या आतील बाजुस असलेल्या शिवम सुंदरम हॉटिल जवळ सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास हजर झालो. सदर ठिकाणी पो.नि. वाघमारे, पंच तसेच पोलीस पथक शासकिय वाहनासह हजर होते. पो.नि. वाघमारे यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे बचतीमधील रू. २०,०००/- (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४० नोटा) पो.नि. वाघमारे यांच्या ताब्यात दिल्या. त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी नमुद नोटांचे त्यांचे मोबाईल फोनवर फोटो काढले.

पो.नि. वाघमारे यांनी आज दि. ०३/०३/२०२२ रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगुन मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन घेण्यात आलेली रक्कम रू. २०,०००/- (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४० नोटा) नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे व अल्ट्रावायलेट दिव्याचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. वाघमारे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा चेहऱ्यावर लावलेला चष्मा हाताने खाली करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम माझे शर्टच्या खिशामध्ये ठेवली. माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. गवळी यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील कार्यालयात रिक्षाने पाठविले. माझे पाठोपाठ पंच क्र. ०२ व पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेलो असता लोकसेवक कवडे हे कार्यालयात उपस्थित होते. मी माझे कामासंदर्भात

(SUSHILKUMAR JOSHI)

चर्चा करीत असताना लोकसेवक कवडे हे मला त्यांच्या कार्यालयाच्या बाहेर घेवुन गेले व पायी चालत कार्यालयाच्या इमारतीबाहेरील मोकळया जागेत घेवुन गेल्यानंतर त्यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. लोकसेवक कवडे यांनी लाचेची रक्कम मागितल्यानंतर मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. २०,०००/- (रू. ५०० दराच्या ४० भारतीय चलनी नोटा) त्यांना दिली असता लोकसेवकाने त्यांच्या पँटच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. लोकसेवक कवडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशारीतीने माझा चेहऱ्यावर लावलेला चष्मा हाताने खाली करून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीस पथकातील अंमलदार हे लोकसेवक कवडे यांना ताब्यात घेत असतानाच लोकसेवकाने झटापट केली व त्यांनी त्यांच्या पँटच्या उजव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम हाताने जमिनीवर फेकली. त्यावेळी पो.नि. वाघमारे यांचे सुचनेनुसार सदर लाचेची रक्कम पंच श्री. गवळी यांनी जमिनीवरून उचलून स्वत:च्या ताब्यात ठेवली.

त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी मला तसेच श्री. कवडे यांना त्यांच्या तिसऱ्या माळयावरील कार्यालयात घेवुन गेले तसेच मला कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस पथकाने श्री. कवडे यांच्या कार्यालयात पुढील कार्यालयीन कार्यवाही करून पुढील कार्यवाहीकरीता पोलीस पथक व लोकसेवक असे लाप्रवि कार्यालय वरळी येथे जाणार असल्याचे सांगितले. त्यादरम्यान श्री. कवडे हे सहकार अधिकारी श्रेणी - २ या पदावर नमुद कार्यालयात काम करीत असल्याचे पो.नि. वाघमारे यांच्याकडून समजले.

त्यानंतर मी, दोन पंच, सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व लोकसेवक कवडे असे आम्ही सर्व दोन शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालय, वरळी येथे आलो. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. देविदास ज्ञानदेव कवडे ( सहकारी अधिकारी श्रेणी - २) यांनी माझी पत्नी श्रीमती मंजू सुशीलकुमार जोशी हिने आम्ही राहत असलेल्या अ‍ॅमेझॉन को.ऑ. सोसयाटी, बोरीवली पश्चिम मुंबई या सोसायटीचे पदाधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथे कलम ७५ (५) महाराष्ट को ऑप. सोसायटी अ‍ॅक्ट १९६० प्रमाणे केलेल्या तक्रार अर्जावर कारवाई करण्याकरीता माझेकडे दि. ०२/०३/२०२२ रू. ५०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केली व तडजोडीअंती रु ४०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे पडताळणी दरम्यान मान्य केले. दि. ०३/०३/२०२२ रोजी लोकसेवक कवडे यांनी लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता रू.२०,०००/- स्विकारली म्हणुन माझी श्री. कवडे यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

मा. उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली पुर्व, मुंबई येथील श्री. कवडे ( सहकारी अधिकारी श्रेणी - २) यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतून समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(SUSHIL KUMAR JOSHI)

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ –

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि. राहत असलेली प्रेसॉन को.हा.सोसा. मधील पदाधिकारी यांच्या गैरकारभाराबाबत फि. यांच्या पत्नीने मा. उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, 'आर' उत्तर, कांदिवली पू. मुंबई, येथे तक्रारअर्ज केला होता. सदर तक्रारअर्ज पुढील कार्यवाहीसाठी आलोसे लतिदास कुवडे यांचेकडे प्रलंबित होता. सदर तक्रारअर्जावर कारवाई करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे लाच म्हणून रु ५००००/- ची मागणी केली व तडजोडीअंती ४०,०००/-रु. घेण्याचे मान्य करुन त्यातील पहिला हप्ता रु २००००/- लाच स्विकारताना दि ०३/03/२०२२ रोजी रंगेहात पकडण्यात आले म्हणून त्यांचेविरुद्ध कलम ७ - भ्रष्टाचार प्रतिबंध अधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमांप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

अमोल वाघमारे, पोलीस निरिक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name अमोल वाघमारे

पदनाम Rank पोलीस निरिक्षक

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting ला.प्र.वि. मुंबई

Code No. of I.O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**